अधिसूचना

क्रमांक :१९८/२०२३ दिनांक : २३/११/२०२३

विषय : जून्या अभ्यासक्रमातील एम.बी.ए. प्रथम व द्वितीय सत्र उत्तीर्ण विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमाच्या तृतीय सत्राच्या प्रवेशासाठी पात्र ठरविण्याबाबत.

सर्व सामान्यांच्या माहितीकरीता अधिसूचित करण्यात येते की, २०२१-२०२२ या शैक्षणिक सत्रापूर्वीच्या एम.बी.ए. ला जुन्या अभ्यासक्रमानूसार प्रवेशित प्रथम व द्वितीय सत्र उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना २०२२-२०२३ या शैक्षणिक सत्रापासून लागु झालेल्या नवीन अभ्यासक्रमाच्या तृतीय सत्राच्या प्रवेशासाठीच्या पात्रतेची बाब विद्यापीठ प्राधिकारीणीने खालील अटी विचारात घेऊन मान्य केली आहे.

१) सदर विद्यार्थ्याचा प्रवेश शैक्षणिक सत्र २०१५-२०१६ या वर्षातील किंवा तद्नंतरचा असावा.
२) सदर विद्यार्थी एम.बी.ए. सेमिस्टर १ व २ चे टर्मवर्क पूर्ण केलेला असावा.
३) सदर विद्यार्थी एम.बी.ए. सेमिस्टर १ व सेमिस्टर २ हा परिक्षार्थी म्हणून विद्यापीठाच्या परिक्षेला या काळात (२०१५-२०१६ ते २०२१-२०२२) प्रवेशीत असावा.
४) शैक्षणिक सत्र २०२२-२०२३ मध्ये अभ्यासक्रमात बदल झालेले असल्याने या बदलांची पूर्तता विद्यार्थ्यांनी करणे बंधनकारक आहे.
५) सेमिस्टर १ व सेमिस्टर २ चे गुण नवीन अभ्यासक्रमानुसार नॉर्मलसी या तत्वानुसार बदल करण्यात येतील.
६) सेमिस्टर १ व सेमिस्टर २ मध्ये अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना दिलेल्या संधी (अधिसूचना क्र.८१/२०२२ दि.०६.१०.२०२२) संपल्यानंतर समकक्ष विषयाची परीक्षा उत्तीर्ण करणे गरजेचे राहील.

स्वा/-
(डॉ. तुषार देशमुख)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

.